मंगळवार, ७ डिसेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १४०
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

अंतरंग

उरणमधील श्वानदंश झालेल्या चिमुकलीचा मृत्यू/३
कर्जत-चौक रस्त्याची डागडुजी करा; अन्यथा आंदोलन!/५
टीम इंडियाचा न्यूझीलंडवर 'विराट' विजय/६

# ठाकरे सरकारला धक्का!

## ओबीसी आरक्षणाच्या अध्यादेशाला सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती

**मुंबई : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे सरकारला जोरदार धक्का बसला आहे. ओबीसी आरक्षणाच्या अध्यादेशाला सोमवारी (दि. ६) सर्वोच्च न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आली. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये ओबीसींना २७ टक्के आरक्षण देता येणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला तसे आदेशही दिले आहेत.

सुप्रीम कोर्टाने काही महिन्यांपूर्वी ओबीसी समाजाला दिलेले नोकरी आणि शिक्षणातील आरक्षण वगळता राजकीय आरक्षणावर स्थगिती दिली होती. त्यानंतर ओबीसी नेत्यांकडून राज्य सरकारच्या कुचकामी भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली होती. मग सरकारने



सुप्रीम कोर्टात ओबीसींचे आरक्षण टिकावे यासाठी याचिका दाखल केली होती. या याचिकेवर गेल्या सात महिन्यांपासून सुनावणी सुरू आहे. दरम्यान, ओबीसींचा वाढता दबाव आणि विरोधी पक्ष भाजपच्या मागणीनंतर सरकारने ओबीसींना राजकीय आरक्षण मिळावे यासाठी अध्यादेश काढला होता, मात्र सुप्रीम कोर्टाने या अध्यादेशाला स्थगिती दिली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये हे आरक्षण लागू होणार नाही.

जोपर्यंत योग्य डेटा आयोगाकडून अथवा समितीकडून मिळत नाही तसेच २७ आकडा कशाच्या आधारावर आणला याबाबत पुरेसा पुरावा मिळत नाही तोवर हा अध्यादेश लागू करता येणार नाही, असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. न्यायमूर्ती खानविलकर आणि न्यायमूर्ती रवीकुमार यांच्या खंडपीठाने राज्य सरकारच्या अध्यादेशाला आव्हान देणाऱ्या रीट याचिकेवर हा निर्णय दिला आहे.

राज्यात आगामी काळात महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि नगर परिषदांच्या निवडणुका होण्याची शक्यता असताना सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय राज्य सरकारसाठी धक्का आहे. या निर्णयाचा आगामी काळातील निवडणुकांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

“

राज्य सरकारने काढलेला अध्यादेश सुप्रीम कोर्टात टिकणार नाही हे महाविकास आघाडीतील मंत्र्यांना आणि अनेक लोकांना माहीत होते. तरीही अध्यादेश काढला. हा चुकीचा अध्यादेश आहे. त्यामुळे तो रद्द झाला. महाविकास आघाडी सरकारने एक महिन्याच्या आत डेटा तयार करावा आणि ओबीसींना आरक्षण द्यावे; अन्यथा महाविकास आघाडी सरकारच्या मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही. संपूर्ण महाराष्ट्रात भाजप आंदोलन करेल.

**–चंद्रशेखर बावनकुळे, भाजप नेते**

# रायगड किल्ल्याला भेट देणे अभिमानाची बाब

## ■ राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे उद्गार



**महाड, अलिबाग : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य अलौकिक होते. १७व्या शतकात त्यांनी दूरदृष्टी दाखवत काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. आज २१व्या शतकातही त्यांचे कार्य नव्या पिढीला प्रेरणादायी ठरतेय. त्यामुळे किल्ले रायगडला भेट देणे ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब आहे. आज या किल्ल्याची केलेली यात्रा मी तीर्थक्षेत्र मानतो, असे उद्गार देशाचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी सोमवारी (दि. ६) काढले. राष्ट्रपतींनी ऐतिहासिक किल्ले रायगडाला भेट दिली. त्या वेळी ते बोलत होते.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, छत्रपती खासदार संभाजीराजे, खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भरत गोगावले, अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे आदी या वेळी उपस्थित होते.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद सहकुटुंब किल्ले रायगडावर आले होते. पत्नी सविता आणि मुलगी स्वाती त्यांच्यासोबत होती. हे सर्व सोमवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास पाचाड येथे हेलिकॉप्टरने दाखल झाले. या ठिकाणाहून विशेष वाहनाने राष्ट्रपती व कुटुंबीय रोप वेकडे गेले. तेथून किल्ल्यावर पोहचले.

रायगडावर राष्ट्रपतींसाठी विशेष बग्गीची व्यवस्था करण्यात आली होती. होळीचा माळ ते जगदिश्वर मंदिर या अंतरात बग्गीचा वापर करण्यात आला. राष्ट्रपतींनी या वेळी राजसदर, होळीचा माळ, जगदिश्वर मंदिर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी भेट दिली. त्यांनी शिवरायांच्या समाधीस्थळाला पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले.

राष्ट्रपतींनी येथे आयोजित एका पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली. या वेळी त्यांच्या हस्ते दोन पुस्तकांचे तसेच रायगडावर आधारित माहितीपटाचे प्रकाशन करण्यात आले.



# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते जनसंवाद कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा बँकेत घोटाळा केल्यामुळे गुन्हेगाराला शिक्षा मिळाली आहे. त्यामुळे जर काही वाईट कराल तर ते याच जन्मात भोगावे लागते, असे परखड प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी (दि. ५) खारघर येथे केले.

भारतीय जनता पक्षाचे खारघर तळोजा मंडल उपाध्यक्ष तथा माजी उपसरपंच संजय घरत यांच्या जनसंवाद कार्यालयाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्या वेळी ते बोलत होते. या कार्यक्रमात अनेक तरुणांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक हरेश केणी, शत्रुघ्न काकडे, प्रवीण पाटील, रामजी बेरा, भटके विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, (पान २ वर..)



## निवडक

### वसीम रिझवी यांनी केला हिंदू धर्मात प्रवेश

**नवी दिल्ली** : शिया सेंट्रल वक्फ बोर्डाचे माजी चेअरमन वसीम रिझवी यांनी सोमवारी (दि. ६) हिंदू धर्मात प्रवेश केला. यासोबतच त्यांनी आपले नावदेखील बदलले आहे. वसीम रिझवी यांचे नवे नाव जितेंद्र नारायण सिंह त्यागी असणार आहे.

### परमबीर सिंह यांना कोर्टाचा मोठा दिलासा

**मुंबई** : येथील माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. सिंह यांच्या प्रकरणावर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने राज्यातील पोलिसांऐवजी अन्य एजन्सीकडून तपास करवून घेण्यास सांगितले आहे तसेच त्यांच्याविरोधात सध्या कुठलीही चार्जशीट दाखल न करण्याचे आदेश मुंबई पोलिसांना दिलेत. याशिवाय त्यांना अटक न करण्याचा आदेशही न्यायालयाने कायम ठेवला आहे.

# पनवेलमध्ये ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठी भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून पनवेल तालुक्यातील रिक्त झालेल्या जागांसाठीही निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार येत्या २१ डिसेंबरला मतदान व २२ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. यासाठी जांभिवली, खानाव आणि कसळखंड या तीन ग्रामपंचायतींमधील भाजपच्या उमेदवारांनी पक्षाचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या उपस्थितीत सोमवारी (दि. ६) तहसीलदार कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केले. ग्रामीण भागात भाजपची वाढलेली ताकद पाहता पक्षाला घवघवीत यश प्राप्त होईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

पनवेल तालुक्यात होणाऱ्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जांभिवली ग्रामपंचायतीमधून सुप्रिया कृणाल निकम (पवार), खानाव ग्रामपंचायतीमधून उषा रोशन फराड व पूनम प्रकाश तवले आणि कसळखंड ग्रामपंचायतीमधून कांता चंद्रकांत मते व मनीषा सचिन पाटील या भाजप उमेदवारांनी अर्ज दाखल केले. (पान २ वर..)

# 'शाळांबाबत स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय'

**मुंबई : प्रतिनिधी**

कोरोनाचा नवा विषाणू ओमायक्रॉनच्या पार्श्वभूमीवर शाळांबाबतचा निर्णय स्थानिक पातळीवर निरीक्षण करून चार ते पाच दिवसांत घेतला जाईल, असे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे. त्यामुळे येत्या १५ डिसेंबरला तरी शाळेची घंटा वाजणार का, याकडे विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष आहे.

राज्यात येत्या १५ डिसेंबरपासून पहिली ते सातवीपर्यंतच्या शाळा सुरू करण्यात येणार आहेत, मात्र कोरोनाच्या नव्या व्हेरियंटमुळे स्थानिक प्रशासनाकडून सावध पवित्रा घेण्यात आला आहे. या संदर्भात शिक्षणमंत्री गायकवाड यांनी सांगितले की, मुंबई, पुण्यात शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. टास्क फोर्ससोबत चर्चा करून नियमावली बनवली आहे.

# उरण विधानसभा मतदारसंघात विविध विकासकामांचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील तुरमाळे, बारवई, सांगुर्ली या ठिकाणी रस्ते काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन, लाडीवली येथे पाण्याच्या पाईपलाईनचे लोकार्पण आणि करंजाडे येथे शौचालयाच्या कामाचे भूमिपूजन रविवारी (दि. ५) आमदार महेश बालदी, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत व इतरांच्या हस्ते झाले. या वेळी आमदार बालदी यांनी छळ आणि कपटामुळे तुम्हाला राज्यात सत्ता मिळाली आहे, अशी घणाघाती टीका विरोधकांवर केली.



पनवेल आणि उरण तालुक्यात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नांमुळे विकासाची गंगा वाहत आहे. त्या अंतर्गत आमदार महेश बालदी यांचा विकास निधी, जिल्हा नियोजन निधी, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना आणि सिडकोच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या विविध कामांचे भूमिपूजन व लोकार्पण झाले. यामध्ये २५ लाख निधीमधून तुरमाळे गावापासून बसस्टॉपपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण, तीन लाख निधीमधून बारवई गावातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण, जिल्हा नियोजनच्या १० लाख निधीतून सांगुर्ली गावापासून स्मशानभूमीपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण, (पान २ वर..)



### महामानवाला अभिवादन

**पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील त्यांच्या पुतळ्याला सोमवारी महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिवादन केले. सोबत स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, नगरसेवक प्रकाश बिनेदार तसेच शशिकांत शेळके व इतर.**

# पनवेल मनपा हद्दीतील रस्ते होणार चकाचक!

## ■ नूतनीकरण व दुरूस्तीसाठी प्रशासकीय खर्चास मान्यता

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीतील रस्ते नूतनीकरण व दुरूस्तीच्या कामासाठी प्रशासकीय खर्चास सोमवारी (दि. ६) रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यामुळे आता पनवेलमधील रस्ते चांगले होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याचबरोबर प्रभाग 'क'मधील लेंडाळे तलावही आता सुशोभीत होणार आहे.



पनवेल महापालिकेच्या स्थायी समितीची बैठक आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवारी सभापती संतोष शेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला सभागृह नेते परेश ठाकूर, सदस्य प्रकाश बिनेदार, निलेश बावीस्कर व समितीचे इतर सदस्य, उपायुक्त विठ्ठल डाके व अन्य अधिकारीवर्ग उपस्थित होता. बैठकीच्या सुरुवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. (पान २ वर..)



पान १ वरून




## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते जनसंवाद कार्यालयाचे उद्घाटन

भाजप खारघर सरचिटणीस दीपक शिंदे, किर्ती नवघरे, नाना घरत, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष गीता चौधरी, मोना अडवाणी, संध्या शारबिद्रे, बिना गोगरी, महिला मोर्चा खारघर अध्यक्ष वनिता पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष विनोद घरत, अमर उपाध्याय, अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश सचिव मन्सूर पटेल, किरण पाटील, नवनीत मारू, ओबीसी मोर्चाचे खारघर अध्यक्ष सुरेश ठाकूर, विपूल चौटालिया, गुरूनाथ म्हात्रे, राजेंद्र मांजरेकर, संदीप रेड्डी, लखबीरसिंग सैनी, किरण पाटील, सुनीत सहाय, सुजित पांडे, फुलाजी ठाकूर, निर्मला यादव, सीमा खडसे, अक्षय पाटील, सस्मित डोळस, आशिष भोईर, यतीन बारसे, सिद्धी घरत, कावेरी डोळस, दिलीप बिष्ट, विजय उजळंबे, विजय बगाडे, रमेश खेडकर, शुभ पाटील, शोभा मिश्रा यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आपल्या भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी सबका साथ सबका विकास या सूत्राने सर्वांना बरोबर घेऊन काम करीत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आणि राज्याचे विरोधी पक्षनेते व माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर व सगळे एकत्र येऊन काम करीत आहेत. त्यामुळे विरोधकांनी कितीही आघाड्या केल्या तरी त्यांची टाप येथे चालणार नाही.

सिडकोने अजून बऱ्याच सुविधा महापालिकेकडे हस्तांतरित केलेल्या नाहीत, पण ज्या सुविधा दिल्या त्यांचे सोने केले असल्याचे सांगत चांगली कामे करता येत नसतील तर वाईट कामेही नका करू, असा सल्ला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विरोधकांना दिला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली भाजप एकजूट होऊन पनवेलसह उत्तर रायगडात जोमाने काम करीत आहेत. या जनसंवाद कार्यालयातूनही नक्कीच चांगली कामे होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्यातील महाविकास आघाडीवर हल्लाबोल केला. आघाडी सरकार जे सत्तेमध्ये बसले आहे त्यांना जनतेच्या हिताचे काही घेणेदेणे नसून स्वतःमध्ये मग्न असलेले हे सरकार आहे. शेतकरी कामगार पक्षाने विवेक पाटलांची अटक टळावी म्हणून महाविकास आघाडी सरकारला पाठिंबा दिला आहे, मात्र ६० हजार ठेवीदार आणि खातेदारांचे पैसे खाल्ल्यामुळे १५ जूनपासून विवेक पाटील तुरूंगात आहेत. पैशांची अफरातफर केली म्हणून ईडीने कारवाई करीत त्यांना अटक केली. अशी कारवाई पोलीस कधी कारवाई करणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

महापालिकेच्या स्थापनेसाठी विरोधकांनी विरोध केला. त्यासाठी कोर्टात गेले. नंतर घनकचरा सेवा कशाला द्यायला पाहिजे यासाठी त्यांनी अनेक प्रकारचे आरोप भाजपवर केले, परंतु आता संपूर्ण देशात घनकचरा व्यवस्थापनाच्या बाबतीत पनवेल महापालिकेने पुरस्कार पटकावून मान उंचवण्याचे काम केले. त्यामुळे विरोधक फक्त जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम करीत आहेत हे सिद्ध झाले, असा आरोपही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केला.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून भाजपच्या सक्षम नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रथमेश सरडेकर, चेतन जाधव, विवेक जाधव, वैभव कोडग, विशाल माईंगडे, अशोक जाधव, सुनील पाटील, दादा कोळेकर, विपूल कदम, संकेत कदम, गौतम कदम, पवन मोरे, चंद्रमणसिंह ठाकूर, अप्सर खान, अनिकेत पाटील, अमर लोंढे या तरुणांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. या सर्वांचे लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व उपस्थित अन्य मान्यवरांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

## पनवेलमध्ये ग्रामपंचायत पोटनिवडणुकीसाठी भाजप उमेदवारांचे अर्ज दाखल

पनवेल तहसील कार्यालयात निवडणूक अधिकारी मुकेश कांबळे, राजेंद्र दत्तात्रेय कांबळे यांच्याकडे अर्ज दाखल करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, खानाव ग्रामपंचायतीच्या सरपंच जयश्री दिसले, उपसरपंच बाळाराम पाटील, जांभिवली ग्रामपंचायतीच्या सरपंच रिया कोंडिलकर, कसळखंड ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी पाटील, माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, उपसरपंच महेंद्र गोजे, प्रवीण ठाकूर, बूथ अध्यक्ष यशवंत पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. भारतीय जनता पक्षाने ग्रामीण भागात केलेली विकासाची कामे आणि पक्षाची वाढलेली ताकद पाहता या निवडणुकीत चांगले यश प्राप्त होईल असे दिसते.

## उरण विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामांचा शुभारंभ

सिडकोच्या माध्यमातून करंजाडे बौद्धवाडा येथे ३० लाख रुपयांच्या शौचालय कामाचे भूमिपूजन या कामांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत सांगुर्ली बसस्टॉपपासून ते गावापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. या कामाचे उद्घाटन आणि आमदार महेश बालदी यांच्या विकास निधीतून लाडीवली गावातील पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन या १७ लाख ८३ रुपयांच्या कामाचे लोकार्पण रविवारी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

ठिकठिकाणी झालेल्या विकासकामांच्या शुभारंभास भाजप नेते कर्णा शेलार, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच रामेश्वर आंग्रे, समीर केणी, सदस्य स्वप्नाली कांबळे, माजी अध्यक्ष मदन गायकवाड, रमाईनगर अध्यक्ष चंद्रकांत कांबळे, सुनील साबळे, शेखर गायकवाड, स्मिता गायकवाड, केळवणे जि. प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, के. सी. पाटील, किसान मोर्चाचे ग्रामीण अध्यक्ष आत्माराम हातमोडे, सांगुर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच पद्माकर कातकरी, दत्तात्रेय हातमोडे, शरद वांगीलकर, सुनील गवंडी, गुळसुंदे जि. प. विभागीय अध्यक्ष व सावळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अविनाश गाताडे, सुनील माळी, गुळसुंदे ग्रामपंचायतीचे सरपंच हरिष बांडे, तालुका उपाध्यक्ष संजय टेंबे, प्रवीण खंडागळे, पोयंजे पं. स. विभागीय अध्यक्ष प्रवीण ठाकूर, माजी उपसरपंच जनार्दन पाटील, सुनील दळवी, कसळखंडचे माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, उपसरपंच महेंद्र गोजे, महेंद्र पाटील, गणेश आगीवले, सचिन दुर्गे, तानाजी पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी पुढे बोलताना सांगितले की, आपण कोणतेही विकासकाम केले की विरोधकांच्या पोटात दुखायला लागते. त्यांना हे नाही समजत की काम समाजाचे आहे. पाच वर्षे तुम्हाला जनतेने संधी दिली होती. त्या वेळी तुम्हाला विकासाची कामे का सुचली नाहीत? आम्ही सर्व समस्या सोडविण्याकरिता पुढाकार घेतो. त्यामुळे तुमचे डोळे उघडले हे निश्चित.

जनतेच्या समस्या जाणून त्यांच्या भल्यासाठी एकत्र येऊन समस्या सोडवूया, पण ही स्पर्धा करीत असताना एखादी योजना अडकू नये याची काळजी राज्यकर्त्यांनी घ्यावी, असा सल्ला देत तुमच्या गावातील ज्या ज्या समस्या असतील त्या मला सांगा. तुम्ही मत देऊन निधी उपलब्ध देण्याची जी जबाबदारी लोकप्रतिनिधी म्हणून माझ्यावर सोपवली आहे ती मी समर्थपणे पूर्ण करेन, अशी ग्वाहीदेखील आमदार बालदी यांनी दिली.

## पनवेल मनपा हद्दीतील रस्ते होणार चकाचक!

या वेळी पनवेल महापालिका हद्दीतील निरनिराळ्या जागी रस्ते दुरुस्ती, नूतनीकरण, सुधारणा वार्षिक तत्त्वावर करण्याच्या कामाला व कामाकरिता वाढीव खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यात आली. प्रभाग 'क'मधील लेंडाळे तलावाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. त्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. शिक्षण विभागातील मुदतपूर्ती झालेल्या मुदत ठेवींचे नूतनीकरणासही मान्यता देण्यात आली. विविध ठिकाणी गटार बांधकाम करण्यास व दुरुस्तीच्या कामासाठी वाढीव खर्चासदेखील स्थायी समितीने मान्यता दिली.

या बैठकीत महापालिकेला वाहन पुरविणाऱ्या जे. के. टुरिस्ट अ‍ॅण्ड ट्रान्सपोर्ट कंपनीला दिलेल्या रकमेबाबत दोन्ही बाजूच्या सदस्यांनी शंका उपस्थित केल्याने तो विषय स्थगित करण्यात आला. एलईडी पथदिवे पुरवठा करण्याबाबत तांत्रिक माहिती उपलब्ध करून न दिल्याने सभागृह नेते परेश ठाकूर यांनी हा विषय स्थगित करण्याची मागणी केली. ती सभापतींनी मान्य केली. मे. गुरुजी इन्फ्रास्ट्रक्चर यांची कंत्राटी तत्त्वावर कर्मचारी पुरवण्याच्या कंत्राटाची मदत संपल्याने त्यांना मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली नाही.

## कर्नाळा खिंडीत अपघातामध्ये एक ठार

**पनवेल : वार्ताहर**

कर्नाळा खिंडीतील तलावाजवळ अवजड वाहनावरील ताबा सुटल्याने झालेल्या अपघातात वाहनचालकाचा मृत्यू झाला असून त्याचा सहकारी जखमी झाला आहे. लक्ष्मण फुलावरे (वय ४०, रा. सोमटणे फाटा) याचे त्यांच्या ताब्यातील वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात झाला. या अपघातात तो फुलावरे गंभीररित्या जखमी होऊन मयत झाले. तर त्यांचे सहकारी प्रभाकर थोरात (वय ५०, रा. रामराज) हे जखमी झाले. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नवीन पनवेलमध्ये देव दिवाळीचा कार्यक्रम

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती; प्रमाणपत्रांचे वितरण

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेच्या वतीने वर्षभर विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असतात. त्या अंतर्गत संस्थेच्या सभासद मैत्रिणीतर्फे देव दिवाळी या कार्यक्रमाचे आयोजन रविवारी (दि. ५) करण्यात आले होते. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नवीन पनवेल पोदी येथील हनुमान मंदिराजवळ झालेल्या या कार्यक्रमामध्ये दीपोत्सवाचे आयोजन करून देव दिवाळी साजरी करण्यात आली. या




कार्यक्रमात नवरात्रीमधील नवरंगांच्या उपक्रमाद्वारे नऊ रंगाचे ज्युस बनवण्याची स्पर्धा, गणपती सजावट स्पर्धा यांसारख्या विविध स्पर्धा वर्षभरात आयोजित केल्या होत्या. या आयोजित स्पर्धांचा निकाल देवदिवाळी कार्यक्रमावेळी जाहीर करण्यात आला. स्पर्धकांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास नगरसेविका चारुशीला घरत, संस्थेच्या अध्यक्षा नीता घाटुगडे, उपाध्यक्ष प्रतिभा माने, सचिव सुलभा मोरे, खजिनदार स्वाती गरुड, सहखजिनदार संध्या भुजबळ, माया देसाई, प्रीती मनोज भुजबळ, नंदा सुभाष भुजबळ, शुभांगी दीक्षित, सपना अत्रे यांच्यासह पदाधिकारी आणि परिसरातील महिला उपस्थित होत्या.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी स्वच्छंद सामाजिक विकास संस्थेच्या माध्यमातून वर्षभरात नवनवीन उपक्रमांचे उत्कृष्ट असे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे कौतुक केले.



**पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला भाजपचे मनोहर मुंबईकर, राहुल वाहुळकर आदींनी अभिवादन केले.**

Required
Jr.Advocate: Female-1 (1/2 Yr. Experience)
Typist : Female-1 (Marathi / English)
Office no 4 & 5, 1st Floor, Tejaswini Arcade, Above PMC Bank, B/H K-Mall, Rly Station Road, Panvel
8898017888

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिल मे. आर. के. एंटरप्राईझेस तर्फे भागीदार **१) श्री. रणजीत हरीश्चंद्र जोशी, २) श्री. रविंद्र गणपत जोशी ३) श्री. दिलीप काशिनाथ म्हात्रे व ४) सौ. शीतल किशोर म्हात्रे** ऑफिस शॉप ४ साई दर्शन बिल्डींग सेक्टर १९, कामोठे, ता. पनवेल, जिल्हा रायगड यांनी खालील वर्णनाच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात मिळालेले २२% भुखंड विकसनाकरिता घेतलेले आहेत. **सदरहू भुखंडाचे ५० टक्के भुखंडाचे हस्तांतर करणेचे आहेत. सदरहू भुखंड हे १) श्री. चिंतामण नामा नाईक रा. रुम क्रमांक ५०१, लक्ष्मी नारायण मंदीराजवळ, कोल्ही कोपर पो. पारगाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, २) श्री. दत्तात्रय नामा नाईक रा. मु. कोल्ही कोपर, पो. पारगाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, ३) श्री. पंढरीनाथ नामा नाईक रा. रुम क्रमांक ५०१, लक्ष्मी नारायण मंदीराजवळ, कोल्ही कोपर पो. पारगाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६** यांच्या मालकीचे आहेत. सदरहू संपादित जमीन मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे.

**संपादित जमीन मिळकतीचे वर्णन**

तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका–पनवेल, जि. परिषद–रायगड, पंचायत समिती पनवेल व मे. दुय्यम निबंधक साहेब, पनवेल यांचे अधिकार कक्षेतील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**संपादित मिळकतीचे वर्णन**

| गाव | तालुका व जिल्हा | अ‍ॅवार्ड क्रमांक | सर्व्हे नं./ हिस्सा नं. | संपादित क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| कोल्ही | पनवेल, रायगड | KOL-ICOGS-133 | ५७/९ | १३२.९४ |

**वरील संपादित मिळकतीच्या मोबदल्यापोटी मिळणाऱ्या भुखंडाचे वर्णन**

| भुखंड वाटपाचे स्थळ | सेक्टर क्रमांक | भुखंड क्रमांक | एफ.फस.आय क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक वडघर | R३ | ४६० | १.५ |

वरील संपादित जमीन मिळकतीवर वा त्यापैकी कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, समजोता करार वा तत्सम कोणतेही स्वरुपाचा दावा, वाद वा मालकी किंवा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे वा समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. सदरहू मुदतीनंतर आलेल्या हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
तारीख : ०६/१२/२०२१

**सही/–**
अ‍ॅड. आशा अरुणकुमार भगत
शॉप ३, प्लॉट ५२, सेक्टर १०, कामोठे, पनवेल,
जि. रायगड. मो.नं. ८१०८३५५०००

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२१ ते २०२६ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थांची नावे– १. रिव्हरसाईड ग्रीन्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, उमरोली २. ग्रीन एकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., वाकडी गांव, सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि.०८–१२–२०२१ ते १४–१२–२०२१, नामनिर्देशन पत्र छाननी दि. १५–१२–२०२१, नामनिर्देशन माघारी दि. १६–१२–२०२१ ते ३०–१२–२०२१ व आवश्यकतेनुसार मतदान दि. ०९–०१–२०२२ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, सुशिला निवास, मिडलक्लास हौसिंग सोसा. पनवेल यांचे कार्यालयात पहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(दत्तात्रय धायगुडे)**
निवडणूक निर्णय अधिकारी

**सही/–**
**(निता पुगांवकर)**
निवडणूक निर्णय अधिकारी

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-14/21-22 / Rfx No.7000020655 | Supply of ATS for newly commission DG set at 400 KV Nagothane s/s under 400kv RS O&M div Nagothane | **Rs 97,940/-** | **14.12.21 up to 23:59hrs** |
| 2 | e-Tender-19/21-22 / Rfx No.7000021566 | Overhauling of 2 no of 400 kV BHEL make SF6 Circuit breaker at 400 kV Nagothane s/s under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel | **Rs 13,20,881/-** | **14.12.21 up to 23:59hrs** |

EMD fee Rs. 5000/- & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/**

**Contact Person:** MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID : ee7230@mahatransco.in

**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM e-Tender Notice No. 04/2021-22**

**Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :**

| SRM e-Tender No. | RFx no. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 17/2021-22 | 7000021579 | Metal spreading in yard, earthing water pipeline, cable trench covers and false ceiling in CR at 220KV Anandnagar Substaion. | 24,22,770.00 |
| 18/2021-22 | 7000021578 | Repairs of collapsed UCR wall by framed RCC wall, repairing and erecting damaged chainlink fencing and metal spreading in 22KV bay and other misc work at 100KV Substation Taloja. | 24,29,679.00 |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: **www.mahatransco.in.**
**Contact person:** Executive Engineer (Civil), Panvel. Telephone No. (022)27480325

**Executive Engineer (Civil), Panvel**

## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी




### पनवेल महानगरपालिका हद्दीत
### मंगळवार, दि. ७ डिसेंबर २०२१ रोजी होणारे

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा–उरण नाका, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी–४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, से.२
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे–मुंबई हायवे)
- १४. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

### कोवॅक्सिन

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. काळण समाज हॉल, पनवेल
- २. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ३. नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ५, खारघर.

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- आसूडगाव रा.जि.प. शाळा
- रोडपाली रा.जि.प. शाळा
- ओवे कॅम्प गाव रा.जि.प. शाळा
- पापडीचा पाडा रा.जि.प. शाळा
- रांजणपाडा रा.जि.प. शाळा
- धरणा कॅम्प रा.जि.प. शाळा
- इनामपुरी रा.जि.प. शाळा
- पिसार्वे रा.जि.प. शाळा
- फरशीपाडा रा.जि.प. शाळा
- धामोळे रा.जि.प. शाळा

# पनवेल परिसरात महामानवाला अभिवादन



सीकेटी महाविद्यालय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, प्रख्यात विधिज्ञ, अर्थतज्ञ, आधुनिक भारताचे स्थापत्यकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या ६५व्या महापरीनिर्वाण दिनाच्या औचित्याने, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्‌स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजच्या संकुल परिसरात सोमवारी (दि. ६) सकाळी ९.३० वाजता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरीनिर्वाण दिनी त्यांच्या कार्यास तथा स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील ह्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. या वेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.



गव्हाण विद्यालय

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ' महापरिनिर्वाण दिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे उपमुख्याध्यापक जगन्नाथराव जाधव यांच्या हस्ते परमपूज्य बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ अर्पण करण्यात आले. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य आणि रयत को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक प्रमोद कोळी, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ज्युनियर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, स्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर, शालेय परीक्षा विभाग प्रमुख चित्रलेखा पाटील, सहायक परीक्षा प्रमुख वृषाली म्हात्रे, पालक संघाचे सचिव देवेंद्र म्हात्रे, ग्रंथालय प्रमुख ग्रंथपाल महेश म्हात्रे, कार्यालयीन लेखनिक चंद्रकांत मढवी, कलाविभाग प्रमुख गणेश भोईर, गांधी विचार संस्कार परीक्षा प्रमुख प्रणाली पाटील, उपशिक्षिका ज्योती माळी, अस्मिता पाटील व उपशिक्षक सागर रंधवे, नाईक मामा आदी उपस्थित होते.







**पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरातील त्यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर जगदिश गायकवाड, नगरसेवक प्रकाश बिनेदार, अजय बहिरा, नगरसेविका चारुशीला घरत आदी उपस्थित होते.**



**कामोठे : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भाजप कार्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, विजय चिपळेकर, दिलीप पाटील तसेच सुधाकर पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, भटके विमुक्त महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे, सामाजिक कार्यकर्ते रवी गोवारी, नारायण पोपेटा, रावसाहेब बुधे, व्यापारी सेलचे अध्यक्ष नाना मगदूम, युवा मोर्चा सरचिटणीस नवनाथ भोसले, उत्तम जाधव, मनीषा वणवे, वैशाली जगदाळे, वनिता पाटील, सुरेखा लांडे, कल्पना जाधव, जयश्री गोडगे, सोनाली खरटमोल, दिव्यांग सेल सहसंयोजक गणेश शिरीषकर, सुरेंद्र हल्लीकर आदी उपस्थित होते.**

**उरण : वार्ताहर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोमवारी (दि. ६) उरणच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर बालोद्यान येथे अभिवादन करण्यात आले.

या वेळी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुकाध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, राजेश ठाकूर, नगरसेविका जानव्ही पंडीत, स्नेहल कासारे, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील, सुरेश पोसतांडेल, रोहित पाटील, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ८४३चे अध्यक्ष प्रकाश कांबळे, उपाध्यक्ष हरेश जाधव, चिटणीस विजय पवार, रोशन गाडे, खजिनदार अनंत जाधव, सुरेश गायकवाड, विनोद कांबळे, अखिलेश जाधव, हर्षद कांबळे, रमाई महिला मंडळाचे अध्यक्ष सुनिता सपकाळे, उपाध्यक्ष संगिता जाधव, पुष्पा कांबळे, सविता साळवी, सुजाता साळवी, बौधाचार्य महेंद्र साळवी, प्रमोद कांबळे, नगर परिषदेचे कर्मचारी आदी उपस्थित होते.





उरण





**पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तालुका व शहर भाजपच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, नगरपालिकेचे माजी आरोग्य सभापती उमेश मानकामे (पोद्दार), कामगार नेते जितेंद्र घरत, कार्यालयीन सचिव रमेश देशमुख आदी उपस्थित होते.**





**खारघर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सेक्टर २१ येथील तेंडूलकर ग्राऊंड चौकात भीमसमृद्धी फेरीवाला संस्थेच्या वतीने भाजप नगरसेवक प्रवीण पाटील यांनी अभिवादन केले. सोबत नगरसेवक रामजी बेरा, युवा कार्यकर्ता शुभ पाटील, पप्पू खामकर, भीमराव लोंढे, अंकिता वारंग, गौतम लोंढे, शैलेश वाघ आदी.**



**पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला करंजाडे सेक्टर ४ येथे प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या वतीने कँडल मार्च काढण्यात आला होता. या वेळी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.**

## सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते कामोठ्यात फास्ट फूड दुकानाचे उद्‌घाटन



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे वसाहतीचा विकास मोठ्या प्रमाणात होत असून, नवनवीन उद्योग चालना मिळत आहे. त्यानुसार सागर म्हात्रे आणि संतोष लांडगे यांनी कामोठ्यात मारुती स्वीट ॲण्ड फास्ट फूड हे दुकान सुरू केले आहे. या दुकानाचे उद्‌घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. ६) करण्यात आले.

या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सागर म्हात्रे आणि संतोष लांडगे यांना पुढील यशस्वी वाटचालीकरीता शुभेच्छा देत मराठी तरुण या व्यवसायात उतरत आहे याचा आनंद आहे, असे मत व्यक्त केले. भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक विजय चिपळेकर, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर यांच्यासह पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

## इनरव्हील क्लबकडून महिलांसाठी आरोग्य शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बऱ्याचदा महिला आपल्या कुटुंबीयांची अतिशय उत्कृष्टपणे काळजी घेतात, परंतु स्वतःकडे मात्र दुर्लक्ष करतात. परिणामी महिलांमध्ये ब्रेस्ट कॅन्सर, गर्भाशयाचे कॅन्सर यांसारखे अनेक रोग बळावत आहेत. त्यासाठी सर्वच महिलांनी स्वतःची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउनने पनवेलच्या लाइफलाइन हॉस्पिटल यांच्या सहकार्याने महिलांसाठी आरोग्य तपासणीचा उपक्रम आयोजित केला. या उपक्रमास नगरसेविका दर्शना भोईर आणि चारुशीला घरत यांची उपस्थिती लावली.

क्लबचे सदस्य आणि इतर महिलांनी या आरोग्य तपासणी उपक्रमाचा लाभ घेतला. हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी लाइफलाइन हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. जयश्री पाटील आणि डॉ. केतकी म्हस्के पाटील व लाइफलाइन हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांचे अतिशय मोलाचे सहकार्य लाभले. यासोबत डॉ. महिंद्रकर यांनी नाममात्र किमतीत टेस्ट करून या शिबिरीसाठी बहुमोल मदत केली.

उपक्रम यशस्वीपणे पूर्ण झाला यासाठी क्लबच्या अध्यक्ष वृषाली सावळेकर यांनी समाधान व्यक्त केले. या वेळी क्लब सेक्रेटरी निता बोराडे, तेजल नाईक, ध्वनी तन्ना, शुभदा भगत, ममता ठक्कर, गिरा चोहान, शितल गायकवाड, स्नेहल गोवेकर, शुभांगी वालेकर, ऋतुजा तटकरी, शितल हजारे, कल्पना नागावकर, बीजल मिरानी यांनी सहभाग घेतला. या शिबिराचा ५१ महिलांनी लाभ घेतला. असेच उपक्रम यापुढेही राबवण्याचा अध्यक्ष वृषाली सावळेकर यांचा मानस आहे.

## उरणमधील श्वानदंश झालेल्या चिमुकलीचा मृत्यू

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील मोठी जुई गावातील २२ रहिवाशांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. माई पाटील या चिमुकल्या मुलीला चावलेल्या कुत्र्यामुळे तिचा उपचारादरम्यान रुग्णालयात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नुकतीच घडली. त्यामुळे कुत्र्यांच्या उच्छादामुळे मोठी जुई गावातील रहिवाशी भयभीत झाले आहेत.



उरण तालुक्यात भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. उरण शहर तसेच गावोगावच्या चिकन दुकानात, गल्लोगल्ली भटकणारी कुत्री ही त्या त्या परिसरातील रहिवाशांना चावा घेत असल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा भटक्या कुत्र्यांची नसबंदी किंवा संख्या कमी करण्यासाठी प्रशासन, वैद्यकीय विभाग असमर्थ ठरत आहे. त्यामुळे गावोगावच्या चिकन दुकानात कोंबडीचे मांस खाणारे कुत्रे हे सर्रास रहिवाशांवर हल्ला चढवत असल्याच्या बातम्या ऐकण्यास मिळत आहेत.

भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याने रानसई गावातील रवींद्र शिंगवा (वय १५) व धर्मी आयत्या दोरे (वय ५२) या दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली होती. मोठी जुई गावात उच्छाद मांडणाऱ्या भटक्या कुत्र्यांनी २२ रहिवाशांना चावा घेतल्याची माहिती समोर आली. त्यात माई पाटील या चिमुकल्या मुलीला कुत्र्याने चावा घेतला होता.

माईने रुग्णालयात २० दिवस मृत्यूशी झुंज दिली, परंतु उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. त्यामुळे मोठी जुई गावातील रहिवाशी अशा कुत्र्यांच्या दहशतीमुळे भीतीच्या सावटाखाली वावरत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी रायगड जिल्हा परिषद, उरण पंचायत समिती यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी मोठी जुईचे रहिवाशी करीत आहेत.



**पनवेल : श्री साईनारायण बाबा यांच्या आशीर्वादाने कै. गणू पदू गवते व कै. गंगाबाई गणू गवते यांच्या पुण्यस्मरणार्थ यमुनाई गणू गवते यांच्या सौजन्याने नेरे येथील साई मंदिरात श्री साईबाबा प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन सोहळा सोमवारी झाला. या सोहळ्याला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, माजी उपसरपंच वासुदेव गवते, श्याम गवते, नरेश पाटील उपस्थित होते.**

## संपादकीय

# आरोपांचे संमेलन

वर्षभरापासून ज्याची तयारी सुरू असते अशा साहित्य संमेलनाचे आयोजन उत्तमरीतीने पार पडले म्हणून आयोजकांनी स्वत:ची पाठ थोपटून घेतली असेल, पण वादंग रूपानेच अधिक समोर आलेल्या यंदाच्या संमेलनाने मराठी साहित्याचे आणि संस्कृतीचे काय भले झाले हा संशोधनाचा विषय आहे. साहित्यिकांचा व विचारवंतांचा मेळा भरणे हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. सर्व साहित्यप्रेमी या सोहळ्याकडे उत्सुकतेने पाहात असतात. पण, 'येथे हे काय सुरू आहे', अशा संभ्रमात साहित्यरसिकांना लोटण्याची परंपरा याही वर्षीच्या संमेलनाने पार पाडली असेच खेदाने म्हणावे लागेल.

**नेहमीचेच साहित्यबाह्य वाद तसेच पूर्णत: राजकीय संदर्भातील आरोप-प्रत्यारोप यांच्या गदारोळाने गाजलेल्या ९४व्या साहित्य संमेलनाचा अखेर समारोप झाला. गोदावरीच्या काठी जमलेला सारस्वतांचा मेळा पांगला आहे. अखेरच्या दिवसापर्यंत रंगलेल्या मानापमानाच्या कलगीतुऱ्यांची सांगता झाली असून गोदावरीच्या तीरावरती पुन्हा एकदा सामान्य माणसाच्या मनाला हवीहवीशी वाटणारी शांतता परतली आहे. भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी या साहित्य संमेलनाबद्दल शुभेच्छाच व्यक्त केल्या होत्या, पण संमेलनाला मात्र केंद्रातील भाजप सरकारच्या विरोधाचे व्यासपीठ असल्याचे स्वरुपच येत गेले. मुळात स्वातंत्र्यवीर सावरकरांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या नाशिकमध्ये हे संमेलन आयोजित होत असूनही त्यांचे नाव देण्यावरून ज्या प्रकारचा वाद या ठिकाणी झाला तो सावरकरांविषयी प्रेम आणि आदर बाळगणाऱ्या प्रत्येक मराठी मनाला निश्चितच खटकला असेल. सावरकरांचे स्वातंत्र्यलढ्यातील योगदान तर सर्वज्ञातच आहे, परंतु सावरकर हे काही निव्वळ राजकीय व्यक्तिमत्त्व नव्हते. भारतीय जनता पक्षाचे नेते व विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी म्हटल्याप्रमाणे ते अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते आणि पत्रकार संमेलनाचेदेखील अध्यक्ष होते. सावरकर लेखक होते, कवी होते, आत्मकथाकार होते. सर्व प्रकारच्या साहित्यकृतींची रचना त्यांनी केली आणि त्यांचे साहित्य रसिकांच्या मनात आजही आपले स्थान टिकवून आहे. असे असूनही नाव देण्यावरून त्यांच्याच गावात त्यांची उपेक्षा केली जावी हे निश्चितच दुर्दैवी आहे. कविवर्य कुसुमाग्रजांविषयी तर प्रत्येक मराठी साहित्यप्रेमीच्या मनात नितांत आदरच आहे, परंतु निव्वळ सावरकरांचे नाव दिले जाऊ नये म्हणून कुसुमाग्रजांचे नाव देणे यातून दोघांचाही अनादरच होतो आणि फडणवीस यांनी याबाबत व्यक्त केलेला निषेध योग्यच आहे, परंतु त्यापुढेही एकंदर राजकीय आरोप-प्रत्यारोपांसाठीच जणू या संपूर्ण साहित्य संमेलनाचा वापर करण्यात आला. मुळात ज्यांना संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान दिला त्यांच्या अनुपस्थितीविषयी मंचावरून टीका-टिप्पणी करून संमेलनाच्या आयोजकांनी मर्यादा ओलांडली. पुढे मग कुठल्याच बाबतीत औचित्य पाळण्याचे भान दिसून आले नाही. सरसकटपणे साहित्य व्यवहार बाजूला पडले, दुय्यम ठरले आणि त्यांची जागा वारेमाप राजकीय भाषणांनी घेतली. हे साहित्य संमेलन होते की एखाद्या राजकीय पक्षाचे अधिवेशन असा प्रश्न कुणाला पडल्यास वावगे ठरणार नाही. मग साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर राजकारणी मंडळी असावीत का नसावीत याची वांझोटी चर्चा वर्षानुवर्षे आपण कशासाठी बरे करीत आलो आहोत? आता पुढील संमेलन उदगीर येथे होणार आहे. निदान तेव्हा तरी संमेलनाच्या मंचावर राजकीय नेत्यांपेक्षा साहित्यिक अधिक दिसतील अशी अपेक्षा आहे.**

# भाजपचा कार्यकर्ता... सर्वगुणसंपन्न!

भारतीय जनता पक्ष हा देशातील क्रमांक एकचा पक्ष असून देशातील बहुतांश राज्यात भाजपची सत्ता आहे. अशावेळी भाजपचा कार्यकर्ता देशातील सर्व घडामोडी आणि पक्षाची ध्येयधोरणे यांच्याबाबत सजग असला पाहिजे, मंडलस्तरापर्यंतचा कार्यकर्ता परिपक्व असावा यासाठी पक्ष प्रयत्न करीत आहे. त्याच हेतुने रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना सर्वगुणसंपन्न बनविण्यासाठी माथेरानमध्ये कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यातून 'शतप्रतिशत भाजप' चा नारा देत कार्यकर्ते माथेरानच्या थंड वातावरणातून बाहेर पडले आहेत.

भाजपचे सर्व मोर्चे आणि जिल्हा पदाधिकारी यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर माथेरानमध्ये आयोजित करण्यात आले होते. या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरासाठी उत्तर रायगड जिल्ह्यामधील भाजपच्या सात मंडलांचे अध्यक्ष आणि जिल्हा कार्यकारिणी तसेच सर्व २७ मोर्चांचे जिल्हा अध्यक्ष यांना निमंत्रित करण्यात आले होते. भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली हे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या शिबिरात निवडणूक व्यवस्थापन, व्यक्तिमत्त्व विकास, देशाचे शेती धोरण विधेयक आणि गैरसमज, राज्यातील राजकीय स्थिती आणि विरोधी पक्ष म्हणून भाजपची भूमिका, पूर्व इतिहास भाजप आणि विकास, केंद्र सरकारच्या सात वर्षाच्या कालावधीत केलेला विकास, केंद्र सरकारने सात वर्षाच्या कालावधीत केलेला विकास आणि सक्षम भारत आदी विषयांवर पक्षातील ज्येष्ठ मार्गदर्शकांनी कार्यकर्त्यांना अवगत केले. पक्षात नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनाही पक्षाची भूमिका समजावी, यासाठी हे शिबिर घेण्यात आल्याचे आयोजक सांगत आहेत. गेल्या दोन वर्षात कर्जत आणि खालापूर तालुक्यात भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. या कार्यकर्त्यांना भाजपची ध्येयधोरणे ज्ञात असली पाहिजेत, यासाठी अशी शिबिरे आयोजित करण्यावर भर दिला जात असल्याचे पक्षाचे जिल्हा अध्यक्ष प्रशांत ठाकूर यांचे म्हणणे आहे. कार्यकर्ते घडविण्यासाठी अशी शिबिरे महत्वाची आहेत. त्यासाठी उरण आणि पनवेल पाठोपाठ भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी कर्जत आणि खालापूर तालुक्याकडे लक्ष वळविले आहे.




शिबिरातील प्रत्येक व्याख्यानाला कार्यकर्त्यांची १०० टक्के उपस्थिती होती त्यामुळे माथेरानसारख्या ठिकाणी पर्यटनासाठी नाही तर कार्यकर्ते प्रशिक्षण घेण्यासाठी आले होते. हे लक्षात येत होते. त्यामुळे शिबिराचा उद्देश यशस्वी झाला असल्याचे कार्यकर्ते देखील मान्य करतात. आणि आयोजकही शिबिर यशस्वी झाल्याचे आवर्जून सांगतात.

शिबिरातील कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रिया यानिमित्ताने बोलक्या असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. या शिबिराच्या माध्यमातून जगण्याची नवीन उमेद मिळली. आपले हे जीवन स्वतः पेक्षा समाजासाठी अधिक समर्पित केलेले असते याची शिकवणदेखील कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरातून समजली. माझ्या विभागातील कार्यकर्ता पक्षाच्या भूमिकेबाबत सक्षम असला पाहिजे यासाठी शिबिरात मिळालेली माहिती विभागातील प्रत्येकाला देण्याचा मी प्रयत्न करणार आहे. शिबिरात मिळालेले मार्गदर्शन इतरांना देऊन आमचे कार्यकर्ते भाजपच्या माध्यमातून बलशाही भारत घडविण्यासाठी अधिक जोमाने कार्यरत होतील अशी अपेक्षा आहे, असे नव्यानेच भाजपचे विभाग अध्यक्ष बनलेले संदीप म्हसकर यांनी सांगितले.

अशी शिबिरे सर्वांगसुंदर व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी महत्वाची आहेत. शिबिरातील वक्त्यांनी केलेले मार्गदर्शन पाहून भाजपबद्दल आणि पक्ष परिवाराबद्दल अधिक जिव्हाळा निर्माण होईल, असे मत भाजप किसान मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष परशुराम म्हसे यांची व्यक्त केले. भाजप हा कार्यकर्त्यांची फळी घडविणारा पक्ष आहे आणि या पक्षात श्रीमंत-गरीब असा कोणताही भेदभाव नाही, याची प्रचिती वेळोवेळी येत असून पदाने कितीही मोठ्या असलेल्या आणि लहान असलेल्या कार्यकर्त्यांशी आम्हाला अदबीने बोलण्याची शिकवण या शिबिरात मिळाली असे ते आवर्जून सांगतात.

कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर माथेरानसारख्या आडबाजूच्या ठिकाणी ठेवल्याबद्दल अनेकांच्या मनात संभ्रम होता. मात्र येथे राहणाऱ्या जनतेचे प्रश्न आणि त्यांची दु:खे काय आहेत, याची कल्पना भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांना असली पाहिजे आणि त्यासाठी माथेरानमध्ये प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्याचा पक्ष नेत्यांचा आग्रह होता. कार्यकर्ते घडविणे, हाच एकमेव उद्देश माथेरानच्या प्रशिक्षण शिबिराचा होता, असे मत आयोजक व्यक्त करीत होते.

**विश्लेषण**
**संतोष पेरणे**

या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराच्या पहिल्या सत्रात निवडणूक व्यवस्थापनामध्ये देशात आघाडीवर असलेल्या चाणक्य ग्रुपचे प्रा. राम भोजने यांनी जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रा. भोजने यांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना निवडणुका कशा जिंकायच्या या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात देशाचे शेती धोरण विधेयक आणि गैरसमज या विषयावर जिल्हा भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील यांनी मार्गदर्शन केले. तर राज्यातील राजकीय स्थिती आणि विरोधी पक्ष म्हणून भाजपची भूमिका या विषयांवर राज्याचे माजी मंत्री आशिष शेलार यांचे मार्गदर्शन कार्यकर्त्यांना लाभले. भाजपचे प्रदेश प्रवक्ते केशव उपाध्ये यांचे मीडिया तसेच सोशल मीडिया कार्यपद्धती आणि उपयोग या विषयावर मार्गदर्शन केले. आमदार महेश बालदी यांनी भाजप आणि विकास या विषयावर मार्गदर्शन केले. आमदार निरंजन डावखरे यांनी केंद्र सरकारच्या सात वर्षाच्या कालावधीत केलेला विकास याबाबतची माहिती दिली. तर संघटनात्मक रचनेतील पक्षाची भूमिका या विषयावर भाजप भटक्या विमुक्त सेलचे प्रदेश अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पवार मार्गदर्शन केले. शेवटी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. माधव भंडारी यांनी समर्थ भारत या विषयावर माहिती मार्गदर्शन केले.

# रोहा तालुक्यात कडधान्य, भाजीपाल्याची लागवड

## पिकावर पावसाचे सावट मात्र कायम

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यात मोठ्या प्रमाणात कडधान्ये व भाजीपाला घेतले जाते. या वर्षी रोहा तालुक्यात नोव्हेंबर अखेरपर्यंत १८००.९५ हेक्टर क्षेत्रामध्ये कडधान्याची तर २८१.५० हेक्टर क्षेत्रामध्ये भाजीपाला लागवड करण्यात आली आहे. मात्र अवकाळी पाऊस कायम राहिल्यास ही पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे.

रोहा तालुक्यात कडधान्य लागवडीचे सरासरी क्षेत्र २०१५.५० हेक्टर आहे. या वर्षी आतापर्यंत १८००.९५ हेक्टर क्षेत्रामध्ये कडधान्यांची लागवड करण्यात आली आहे. तालुक्यातील खारापटी, मेढा, नागोठणे, धाटाव आदी परिसरात वालाची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. यंदा १०००.२० हेक्टर क्षेत्रामध्ये वालाची लागवड करण्यात आली आहे. त्यानंतर चवळी १६५ हेक्टर, मटकी १७५.५० हेक्टर, हरभरा ७१.२० हेक्टर, मुग ३२७.५० हेक्टर, इतर कडधान्ये ६१.५५ हेक्टर क्षेत्रामध्ये लावण्यात आली आहेत. काही ठिकाणी आद्याप लागवड चालू आहे..


(छाया : महादेव सरसंबे)

रोहा तालुक्यात मोठ्या प्रमाणात भाजीपाला लागवडही केली जात असून, त्यात प्रामुख्याने कारली, शिराळी, मिरची ही पिके घेतली जातात. प्रामुख्याने बाहे, खैराळे, किल्ला आदी ठिकाणी भाजीपाला लागवड केली जाते. या वर्षी आतापर्यंत २८१.५० हेक्टर क्षेत्रामध्ये भाजीपाला लागवड करण्यात आली आहे. या मध्ये प्रामुख्याने वांगी १२.५० हेक्टर, मिरची ८२.५० हेक्टर, टोमॅटो १.५० हेक्टर, भेंडी ३.५० हेक्टर, शिराली ७७.५० हेक्टर, काकडी १.२० हेक्टर, कारली ७५.३५ हेक्टर, पडवळ १२.४५ हेक्टर, घोसाळी ५.६५ हेक्टर, दुधी ९.३५ हेक्टर क्षेत्रामध्ये लागवड करण्यात आली आहे. भाजीपाला लागवड क्षेत्र सरासरी ५५४ हेक्टर असून या रब्बी हंगामात आतापर्यंत २८१.५० हेक्टर क्षेत्रामध्ये लागवड करण्यात आली आहे. रोह्याची कलिंगडे जिल्ह्यात प्रसिध्द आहेत. या वर्षी कलिंगड १४३.५० हेक्टर क्षेत्रामध्ये घेतले जात आहे.

या वर्षी नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात व डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात रोहा तालुक्यात अवकाळी पाऊस पडला. हा पाऊस असाच कायम राहिल्यास पिकांचे मुळ कुजणे, पाने पिवळी व पडण्याची संभावना आहे. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे.

# कळंब परिसरातील शिवसैनिक राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल


(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील कळंब ग्रामपंचायत हद्दीतील सुतारपाडा, गरुडपाडा, तळेनगर येथील अनेक शिवसैनिकांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

कळंब ग्रामपंचायत हद्दीतील सुतारपाडा गावामधील सुमारे ४० तसेच कळंब कातकरवाडी, तळेनगर, गरुडपाडा येथील अनेक शिवसैनिक माजी आमदार सुरेश लाड यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दाखल झाले. कर्जत येथील राष्ट्रवादी भवन येथे झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमाला रायगड जि. प.चे उपाध्यक्ष सुधाकर घारे,कर्जत नगर परिषदेतील विरोधी पक्षनेते शरद लाड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सागर शेळके, माजी सरपंच फाईक खान, ज्येष्ठ कार्यकर्ते नामदेव बदे, शहनवाज पानसरे, विनोद मोरे उपस्थित होते.

यावेळी सुतारपाडा गावातील मनोहर निरगुडा, हरिचंद्र निरगुडा, काशिनाथ निरगुडा, दत्ता निरगुडा, विजय निरगुडा, अर्जुन निरगुडा, महादू शीड, किसान शीड, काळुराम शीड, बुधाजी ढोले, आंबो पारधी, जणू थोराड, मंगेश पवार यांच्यासह ४० कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. तर गरुडपाडा येथील सागर आगिवले, शरद कुंभार, बबन मोरे, मंगेश कोंडेकर, अनिल गीते, गणेश खुणे यांच्यासह अर्जुन बडे, आंबो ढोले, भास्कर ढोले, भरात ढोले, पंडित पारधी, अनिल निरगुडा, बळीराम निरगुडा, चंदर पवार, दिलीप वाघ, जनार्दन मुकणे आदी शिवसैनीक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दाखल झाले.

# कर्जतमधील बार्डी येथे संजीवन समाधी सोहळा





**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील बार्डी येथे शुक्रवारी हभप विजय महाराज थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी दिंडी सोहळा, हरिपाठ, प्रवचन, भजन, दीपोत्सव, हरिकीर्तन आदी कार्यक्रम झाले.

बार्डी परिसरातील वारकरी आणि ग्रामस्थांना दरवर्षी आळंदीला जाणे शक्य होत नाही. त्यामुळे बार्डी गावातच संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा साजरा करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. त्यानुसार शुक्रवारी सकाळी माउलींच्या प्रतिमा पूजनाने संजीवन समाधी सोहळ्याची सुरुवात करण्याने आली. यावेळी ज्ञानेश्वरी, वीणा, मृदंग आणि कलश पूजन तसेच ज्ञानेश्वरी पारायण करण्यात आले. संध्याकाळी हभप बाळू महाराज वाव्हळ यांचे प्रवचन झाले. त्यानंतर पालखी आणि दीपोत्सवाला रामदास महाराज पाटील, भरत भगत, निवृत्ती महाराज शिंदे, नागो गवळी, यश बडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय कोंडिलकर यांनी केले. भरत कांबरी यांनी आभार मानले. या सोहळ्यासाठी अक्षय चव्हाण, हेमंत कोंडिलकर, प्रमोद कोंडिलकर, धर्मा जोगळे, भास्कर कांबरी, नारायण मालुसरे यांनी विशेष मेहनत घेतली.

# जगदिश मरागजे यांचा पोलीस अधीक्षकांकडून सन्मान

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापुर तालुका पोलीस ठाण्याच्या गणराय अवार्ड परिक्षण समितीचे प्रमुख जगदीश मरागजे यांना रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. योगायोग म्हणजे ते सदस्य असलेल्या आर्यन स्पोर्ट्स क्लब (वडवळ) आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेदेखील या वेळी सन्मान करण्यात आला.

उप विभागीय अधिकारी अजित नैराळे, खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल विभूते, खोपोलीचे पोलीस निरीक्षक गिरीश पवार, पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी तसेच राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर या वेळी उपस्थित होते.



(छाया : अरुण नलावडे)

# कळंब मिरचुलवाडीमध्ये शिवसेना, राष्ट्रवादीला गळती

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील कळंब ग्रामपंचायत हद्दीमध्ये असलेल्या मिरचुलवाडी येथील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शेकापमध्ये प्रवेश केला. त्यामुळे शेकाप सोडून शिवसेनेत गेलेल्या नेत्याला जोरदार चपराक बसली आहे.

आगामी जि.प आणि पं. स. निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मिरचुलवाडीमधील महेश निरगुडा, हरिचंद्र ढोले, हरी ढोले, भरत दोरे, हरिचंद्र पारधी, लालू पारधी, वामन निरगुडा, गणेश पारधी, पांडुरंग निरगुडा, हनुमान आवाटे, मारूती ढोले, सोमा आवाटे, धनेश कांबडी, काशिनाथ ढोले, गणेश ढोले, बुधाजी मेंगाळ, गणपत निरगुडा, गोपाळ दोरे, भरत निरगुडा, काळुराम निरगुडा, सुनिल ढोले, काशिनाथ ढोले, जनार्दन दोरे, लक्ष्मण मेंगाळ, चंद्रकांत कडाळी, गणेश पारधी, विलास कांबडी, गणेश निरगुडा, सुनिल ढोले, सुरेश निरगुडा, करण ढोले, प्रकाश मेंगाळ, बुधाजी मेंगाळ, गणेश ढोले, किरण केवारी, गणपत निरगुडा, विलास मेंगाळ, मारूती ढोले, जनार्दन आवाटे, राजेश पारधी, तुकाराम निरगुडा, शिवाजी निरगुडा, जानू पारधी, राहूल निरगुडा, सुनिल निरगुडा, राजेश ढोले, बबन आवाटे, राम निरगुडा आदी कार्यकर्त्यांनी शेकापत प्रवेश केला.

रायगड जि. प. चे माजी सभापती नारायण डामसे, माजी सरपंच कृष्णा बदे, रेवता ढोले, तसेच नीलम ढोले, जयवंती हिंदोळा, बबन भालेराव, सुलतान कुरेशी, भरत ऐनकर, नारायण मोरे, गणेश मानकामे, सुनिल बदे, दत्ता राणे, महेश म्हसे, आदित्य गायकवाड, मंगेश खेडेकर, गणेश म्हसे, शिवाजी सांबरी आदी उपस्थित होते.

# कर्जत-चौक रस्त्यावरील खड्डे भरावेत; अन्यथा आंदोलन करण्याचा भाजपचा इशारा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-चौक मार्गावरील खड्डे त्वरित न भरल्यास आंदोलन करण्याचा इशारा भाजपच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदनाद्वारे देण्यात आला.

कर्जत-चौक मार्गावर गेल्या अनेक दिवसापासून मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्याचा वाहन चालक व प्रवाशांना खूप त्रास होतो. कर्जत येथून पनवेल, नवी मुंबई येथे नोकरी, व्यवसायासाठी अनेकांना दुचाकी किंवा चारचाकी वाहनाने रोज जा-ये करावी लागते. अनेक वेळा दुचाकीस्वार या खड्ड्यात गाडी आपटून पडतात आणि खूप मोठी दुखापत होते किंवा काही वेळा जीवितहानीसुद्धा होते. या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेऊन भारतीय जनता पक्ष किसान मोर्चाचे प्रदेश चिटणीस सुनिल गोगटे यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. त्यात कर्जत-चौक रस्त्यावरील खड्डे ताबडतोब भरावेत. अन्यथा भारतीय जनता पार्टी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला आहे.


(छाया : विजय मांडे)

सार्वजनिक बांधकाम खात्याचे कर्जत येथील प्रभारी उपविभागीय अभियंता चौधरी यांनी या वेळी सकारात्मक प्रतिसाद देऊन दोन ते तीन दिवसांत खड्डे भरायला सुरवात करू असे आश्वासन दिले.

# पोलादपूर नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १९ उमेदवारी अर्ज दाखल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

येथील नगरपंचायत निवडणुकीसाठी सोमवारी (दि. ६) काँग्रेसतर्फे १०, भारतीय जनता पक्षातर्फे सहा, शिवसेनेतर्फे दोन तर अखिल भारतीय सेनेतर्फे एक उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला असल्याची माहिती सहायक निवडणुक निर्वाचन अधिकारी तथा मुख्याधिकारी महादेव रोडगे यांनी दिली.

पोलादपूर नगरपंचायतीच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी शेवटच्या दोन दिवशी इच्छुकांनी तसेच अधिकृत उमेदवारी जाहीर झालेल्यांनी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरुवात केली आहे.

भाजपतर्फे तालुका अध्यक्ष प्रसन्ना दगडू पालांडे (प्रभाग १३), शीला पंकज बुटाला (प्रभाग ४), रश्मी राजा दिक्षित (प्रभाग ६), अंकिता अरविंद जांभळेकर (प्रभाग १४), एकनाथ नारायण कासुर्डे (प्रभाग १५) आणि निलेश विजय आंबेतकर (प्रभाग ३) यांनी सोमवारी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

काँग्रेस तर्फे दिलीप भागवत, स्वप्नील भुवड, तेजश्री गरुड, शर्मिला दुदुस्कर, अस्मिता जांभळेकर निखिल कापडेकर, प्रतिक्षा शिंदे, अर्पणा कदम, प्रकाश भुतकर आणि कल्पेश मोहिते आदी उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केली. शिवसेनेकडून माजी नगराध्यक्षा सुनीता पार्टे आणि अस्मिता पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

पोलादपूर नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये अखिल भारतीय सेनेतर्फे प्रथमच महेंद्र श्रीपती जाधव यांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे. यामुळे पोलादपूर नगरपंचायत निवडणुकीमध्ये पारंपरिक काँग्रेस व शिवसेना या प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांखेरिज भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, अभासेना असे पाच राजकीय पक्ष दिसून येणार आहेत.


# चौक येथे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**चौक : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारिणी सभा या संस्थेच्या चौक येथील सरनोबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात सोमवारी (दि.६) महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन केले तसेच त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या कार्याबद्दल मनोगत व्यक्त केले. शाळेच्या शिक्षिका सुवर्णा घाटे यांनी बाबासाहेबांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली.

सूत्रसंचालन घाटे मॅडम यांनी केले. पर्यवेक्षक मुळीक, डी. एस. कांबळे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. प्राची जाधव यांनी आभार मानले.





# ममदापूर उपसरपंचावर अविश्वासदर्शक ठराव मंजूर

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील ममदापूर ग्रामपंचायतीचे शेकापचे उपसरपंच चंद्रकांत शिनारे यांच्यावर अविश्वास ठराव मंजूर झाला आहे. त्यामुळे शेकापचा थेट सरपंच असलेल्या या ग्रामपंचायतीमध्ये शेकापच्याच उपसरपंचावर आपले पद सोडण्याची नामुष्की ओढवली आहे.

सार्वत्रिक निवडणूकीमध्ये थेट सरपंचपदासह शेकापने ममदापूर ग्रामपंचायतीची सत्ताही मिळविली होती. काही महिन्यांपूर्वी चंद्रकांत शिनारे यांची उपसरपंचपदावर निवड झाली होती, मात्र त्यांच्यावर १० पैकी आठ सदस्यांनी तहसीलदारांकडे अविश्वास ठराव दाखल केला होता. त्यावर चर्चा करण्यासाठी तहसीलदार विक्रम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यलयात विशेष सभा आयोजिण्यात आली होती. या सभेला सरपंच, उपसरपंचासह सदस्य उपस्थित होते. या वेळी हात उंचावून झालेल्या मतदान प्रक्रियेत अविश्वास ठरावाच्या बाजूने आठ सदस्यांनी मतदान केले. त्यामुळे उपसरपंच शिनारे यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर झाला.

# अवकाळी पाऊस पशू-पक्ष्यांच्या मुळावर; अनेकांचा मृत्यू

**पाली : प्रतिनिधी**

अवकाळी पाऊस व बदलते ऋतुचक्र यामुळे सुधागड तालुक्यातील पशु-पक्षांची वाताहत झाली आहे. पाकोळीसारख्या शेकडो पक्षांचा मृत्यू झाला आहे. खाद्य न मिळाल्याने कीटक व सरपटणारे प्राण्यांची उपासमार होत असल्याचे पहायला मिळत आहे. खराब हवामानामुळे पक्षी बाहेर मुक्त संचार करत नाहीत. त्याचा फटका पक्षी निरीक्षणाला फटका बसला आहे. वातावरण असेच राहिले तर पशू-पक्ष्यांच्या अस्तित्वावर घाला येईल, असे मत पक्षी निरीक्षक व्यक्त करीत आहेत.

जिल्ह्यातील काही पक्षी अभ्यासकांनी केलेल्या निरीक्षणावरून ही बाब समोर आली असून. याबाबत त्यांनी व पक्षीप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे.

हजारो किमीचा प्रवास करून परतीच्या मार्गावर असलेले काही तिबोटी खंड्यांना अवकाळी पावसाचा फटका बसला आहे.

पावसाचे पाणी घुसून गिधाडे व इतर पक्षांची काही घरटी ढासळली आहेत. पाऊस व उष्णतेचा परिणाम पक्षांच्या अंड्यांवरदेखील होण्याची शक्यता आहे. पाऊस असल्याने गवतावरील कीटक उडत नव्हते. त्यामुळे या कीटकांची हवेतल्या हवेत शिकार करणाऱ्या पाकोळीसारख्या पक्षांची उपासमार झालेली पहायला मिळाली. या उपासमारीने थकून असंख्य पक्षी खाली कोसळून मृत झाले. पक्षी अभ्यासक शंतनू कुवेसकर यांनी थकून पडलेल्या तिबोटी खंड्याला काही दिवसांपूर्वी वाचविले होते.

### पक्षीप्रेमींचा हिरमोड

पक्षांना अन्न उपलब्ध होण्यासाठी पुरेशा सूर्यप्रकाशाबरोबरच कीटक व सरपटणारे प्राणी लागतात. मात्र या दोन्ही गोष्टी उपलब्ध होत नसल्याने पक्षी मुक्त संचार करताना दिसत नाहीत. परिणामी सकाळी व सायंकाळी पक्षी दर्शनासाठी व त्यांना कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी धडपडणाऱ्या हौशी पक्षीप्रेमींचा हिरमोड झालेला दिसून येत आहे.

### पक्ष्यांच्या जीवनक्रमात बदल

नोव्हेंबर ते मार्च हा शिकारी पक्षांचा विणीचा हंगाम असतो, या पक्षांची घरटी उंच झाडांवर असतात. अवकाळी पावसामुळे या पक्षांना घरटी बांधणे अवघड झाले आहे. यामुळे त्यांच्या जीवनचक्रात निश्चितच बदल होताना दिसून येत आहे.







**हवामान बदलाचा परिणाम पक्षांवर अधिक प्रमाणात दिसून येत आहे. काही पक्षांनी अद्यापही कोकणात स्तलांतर सुरु केले नाही, तर हजारो किलोमीटरवरून स्थलांतर करून जूनमध्ये आलेले काही पक्षी अद्यापही इथेच थांबलेले दिसून येत आहेत. ढगाळ हवामान आणि पावसामुळे पक्षांना अन्न उपलब्ध होणे कठीण झाल्याने त्यांची उपासमार होताना दिसून येत आहे.**

**-राम मुंढे, पक्षी अभ्यासक व निरीक्षक**


**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर प्रगटन**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५, २०६ व २०९ अन्वये**

**जा.क्र.पमपा/नरवि/रस्ते/२६-२१/प्र.क्र.०६/२४६४/२०२१**

**दिनांक : ०३/१२/२०२१**

ज्याअर्थी अंबरनाथ - कुळगांव बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्राची विकास योजना शासनाचे नगर विकास विभाग अधिसूचना क्र. टी पी एस-१२०४/९४१/ सीआर-१६३/०४/नवि-१२ दि. २५ जूलै २००५ अन्वये शासनाने मंजुर केली आहे आणि उक्त विकास योजना दि. १२ ऑगस्ट २००५ पासून अंमलात आलेली आहे (यात या पुढे ज्याचा उल्लेख ''उक्त एम एम आर डी ए विकास योजना'' असा करण्यात आला आहे);

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याच्या निर्देश ''उक्त अधिनियम'' असा करण्यात आला आहे) चे कलम ११३(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासनाने नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७१/१८१२४/११३/आय डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ द्वारे, यात नमूद करण्यात आलेले क्षेत्र हे नवी मुंबई ह्या नवीन नगराचे क्षेत्र म्हणून घोषित केले आहे व सिडकोस नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्रमांक आरपीबी. १८१२४/ II डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ अन्वये, उक्त अधिनियमांच्या कलम ११३(३अ) नुसार नवी मुंबई या नवीन नगर क्षेत्रासाठी (उक्त नवनगरक्षेत्र) नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासनाने उक्त नवनगर क्षेत्रासाठी सिडकोने सादर केलेल्या रचनाबध्द आराखड्याच्या (Structural Plan) स्वरूपात असलेल्या प्रारूप विकास योजनेस (उक्त अंतिम विकास योजना) नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७५/६३५/यूडी-५, दिनांक १८ ऑगस्ट १९७९ सह अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७५/६३५/यूडी-५, दिनांक १८ जानेवारी १९८० अन्वये मंजुरी दिलेली आहे आणि उक्त विकास योजना दिनांक १ मार्च १९८० पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा उल्लेख ''उक्त महानगरपालिका अधिनियम'' असा करण्यात आला आहे) चे कलम ३ च्या पोट कलम (४) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग अधिसूचना क्रमांक पनप - २९१४/व्ही आय फी सं.क्र. ३०१/प्र.क्र. ३५४/नवि-२३, दि.२६ सप्टेंबर २०१६ अन्वये पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र व २९ महसुली गावांच्या क्षेत्रासाठी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून ती दिनांक १ ऑक्टोबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये उक्त एम एम आर डी ए विकास योजनेतील ११ महसुली गावांचा समावेश करणेत आलेला आहे;

आणि ज्याअर्थी उक्त अंतिम विकास योजना व उक्त मंजूर एम एम आर डी ए विकास योजना एकमेकांना लागून आहेत आणि मंजूर विकास योजनेतील रस्ते उक्त मंजूर तत्कालीन एम एम आर डी ए विकास याजनेतील तळोजे मजकूर या महसुली गावाच्या हद्दीपर्यंत तयार करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अंतिम विकास योजना व उक्त मंजुर एम एम आर डी ए विकास योजनामध्ये Missing Links असल्याने पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील वाहतूक सोयीची व दळणवळण सुकर होण्यासाठी नवीन जोड रस्ते तयार करणे गरजेचे आहे.

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५, २०६ व २०९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रामध्ये नविन रस्ते तयार करणे, रस्त्याची रूंदी निश्चित करणे व रस्त्यांची सुधारणा करणेचा अधिकार महानगरपालिकेला आहे;

आणि ज्याअर्थी वरील संदर्भ उक्त करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १९० दि.०५/०९/२०१९ अन्वये आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना प्राधिकृत केले आहे;

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेल्या मौजे-तळोजा मजकूर या महसुली गावाच्या स. नं. १३१ पासून ते मौजे-घोट या महसुली गावाच्या स. नं. ६६ पर्यंत १५.०० मी. रुंदीचा नवीन सार्वजनिक रस्ता आखणे व तयार करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५, २०६ व २०९ अन्वये या कार्यालयाचे जाहीर प्रकटन जा. क्र. पमपा/नरवि/रस्ते/२६-२१/प्र.क्र.०६/२०३३/२०२१, दि.०८/१०/२०२० अन्वये महाराष्ट्र शासनाचे असाधारण राजपत्र क्र.७९, दि.०८/१०/२०२१ व दि.०९/१०/२०२१ च्या दै. रामप्रहर, दै. नवाकाळ, दै. किल्ले रायगड व दै. नवराष्ट्र या वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन वरील प्रकटन शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, वरील रस्त्याच्या आखणीबाबत नागरिकांकडून विहित मुदतीत कोणत्याही हरकती व सूचना प्राप्त झाल्या नाहीत.

आणि ज्याअर्थी, नवीन सार्वजनिक रस्त्याची आखणी व संरेखांकन मध्ये किरकोळ बदल करून करण्यास अंतिम मान्यता देण्यात आली आहे;

त्याअर्थी, मी गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महानगरपालिका मला प्राप्त अधिकारांन्वये खालील परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या नवीन जोड रस्त्याची आखणी व परिशिष्ट 'ब' मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे रस्त्याचे संरेखांकन मंजूर करीत आहे. सदर परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' च्या प्रति नागरीकांच्या पाहणी करिता सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ १ महिन्यांच्या कालावधीसाठी उपलब्ध राहील.

ठिकाण :- पनवेल.
दिनांक :- ०३ /१२ /२०२१

**सही/-**
**(गणेश देशमुख)**
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

**परिशिष्ट -अ**

**रस्त्याचे संक्षिप्त विवरण**

मौजे-तळोजा मजकूर या महसुली गावाच्या स. नं. १३१ पासून ते मौजे-घोट या महसुली गावाच्या स. नं. ६६ पर्यंत १५.०० मी. रुंदीचा नवीन सार्वजनिक रस्ता आखणे व तयार करणे. वरील रस्त्याचे संरेखांकनामुळे बाधित होणारे सर्व्हे नं./गट नं.

| अनु.क्र. | महसुली गावांचे नाव | सर्व्हे नं./गट नं. |
|---|---|---|
| १ | मौजे-तळोजा मजकूर | १३१ (पैकी), १२९(पैकी), ७८ (पैकी), ७९ (पैकी), ८० (पैकी), १०७ (पैकी), १०६ (पैकी), १०८ (पैकी) |
| २ | मौजे-घोट | ५२(पैकी), ५३ (पैकी), ५४(पैकी), ६६(पैकी) |

**टीप :-** वरील रस्त्याची प्रत्यक्ष आखणी करतेवेळी वरील बाधित जागेव्यतिरिक्त इतर जागा बाधित होत असल्यास सदरची जागा ही प्रस्तावित रस्त्याचा भाग समजण्यात येईल.

**परिशिष्ट - ब**

प्रस्तावीत रस्त्याचे संरेखांकन दर्शविणारा नकाशा नागरीकांच्या पाहणी करीता सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात खुला ठेवण्यात आलेला आहे.

ठिकाण :- पनवेल.
दिनांक :- ०३ /१२ /२०२१

**सही/-**
**(गणेश देशमुख)**
आयुक्त
पनवेल महानगरपालिका



**PANVEL MUNICIPAL CORPORATION**

**Public Notice**

**Maharashtra Municipal Corporation Act, 1949 Section 205, 206 & 209**

**No. PMC/TPD/ROADS/26-21/S.NO. 06/2464/2021**

**Date - 03/12/2021**

Whereas the Ambarnath - Kulgaon Badlapur & Surrounding Notified area Development Plan has been sanctioned by the Government of Maharashtra in Urban Development Department vide notification no. TPS – 1204/941/CR - 1630/ UD-12, dated 25 July 2005 and it has came into force with effect from 12th August 2005 (hereinafter referred as the said MMRDA Development plan);

And whereas, the Govt., in exercise of the powers conferred by Section 113(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "said Act") has designated site for New – Town of Navi Mumbai (hereinafter referred to as "Said New Town"). vide Urban Development and Public Health Department's (UD and PH) Notification No. RPB. 1171/18124/I.W., dated the 20th March 1971 and CIDCO has been appointed as New Town Department Authority (NTDA) for the said New Town Under Section 113(3A) of the said Act vide Urban Development and Public Health Department's Notification No.RPB. 117/18124/ II.W., dated the 20th March 1971;

And whereas, the Govt. in exercise of the Powers conferred by Section 31(1) of the said Act vide UD and PHD's Notification No.RPB. 1175/635/UD-5, dated the 18th January 1980 has been sanctioned the Draft Development Plan (hereinafter referred to as said Final Development Plan) in the form of structural plan submitted by CIDCO for the said New Town area and the said Final Development Plan came into force with effect from 1st March 1980;

And whereas, the Government in exercise of the power conferred by Section 3 of the Maharashtra Municipal Corporation Act, 1949 (hereinafter referred to as the "said MMC Act"). vide the Urban Development Department notification no. PNP.2014/VIP No. 301/CR. 354/UD/23 dated the 26th September, 2016 constituted the Panvel Municipal Corporation for the areas of whole area of Panvel Municipal Council &29 revenue villages specified therein, which came into force with effect from 1st October 2016.

And whereas; the said MMRDA Development Plan's 11 revenue villages has been included in the Panvel Municipal Corporation Area;

And whereas, the said Final Development Plan & said MMRDA Developed Plan are adjecent to each other and the roads already developed in the said Sanctioned Development plan are up to the boundary limit of Taloje Majkur revenue village in said earstwhile MMRDA Development Plan;

And whereas there are Missing links in the said Final Development Plan & the said MMRDA Development Plan it has become expedient to connect the Missing Links by preparing new roads so as to enable the traffic Smoothly & to make the conveniently traffic within the Panvel Municipal Corporation;

And whereas, as per the provisions of the said MMC Act, Sections 205, 206, & 209 empowers the Municipal Corporation to prepare the new roads, to decide the width of the roads and to improve the roads within the Municipal Corporation Area;

And whereas, the Panvel Municipal Corporation vide General Body Resolution no. 190 dated 05/09/2019 delegated the powers under Section 205, 206 & 209 of the said MMC Act to Commissioner, Panvel Municipal Corporation;

And whereas, Panvel Municipal Corporation has published the Notice vide No. PMC/TPD/Roads/26-21/S.No.06/2033/2021, dated 08th October 2021 in Maharashtra Government Extra-Ordinary Gazette No. 79, dated 08th October 2021 and published in Daily Ramprahar and Daily Nava Kal, Daily Kille Raigad and Daily Navrashtra newspapers on 09th October 2021 for inviting suggestions and objections to the said proposed draft alignment of New Public 15.00 M wide Road from S.No.131 of Taloja Majkur Revenue Village to S.No. 66 of Ghot Revenue Village as shown in the Annexure 'A' and Annexure 'B' with the provisions contained in the sections 205, 206 and 209 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 from the public thereof within 30 days from the date of publication of the notice in Maharashtra Government Extra-Ordinary Gazette;

And whereas, no any suggestions and objections received from public within prescribed period;

And whereas, proposed alignment of New Public Road has been sanctioned with some minor correction;

Therefore, as per the powers delegated by Panvel Municipal Corporation to the Commissioner, Panvel Municipal Corporation and in exercise of the powers, I, Ganesh Deshmukh, Commissioner, Panvel Municipal Corporation here by sanctions the alignment of proposed new road as mentioned in the Annexure 'A' and plan appended hereto Annexure 'B' showing the alignment of new road is kept open for the inspection of general public on all working days and in working hours in the office the of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation for a period of one month.

Panvel.
Date :- 03/12/2021

**Sd/-**
**(Ganesh Deshmukh)**
Commissioner
Panvel Municipal Corporation

**'Schedule 'A'**

**Description of Road**

Layout and make a new public street/road from S.No.131 of Mouje Taloja Majkur revenue village to S.No.66 of Mouje Ghot revenue village.

Details of S.No. of lands affected by the proposed alignment of the new road is as below.

| S.No | Name of Revenue village and Survey No |
|---|---|
| 1 | **Mouje Taloja Majkur :** 131(p), 129(p), 78(p), 79(p),80(p),107(p),106(p), 108(p) |
| 2 | **Mouje Ghot :** 52(p), 53(p), 54(p), 66(p) |

Note :- Other than above listed survey number, if any other survey number existed while laying out the road then it will also be the part of the above proposed road.

**'Schedule 'B'**

Plan showing proposed alignment of both roads is kept open for Inspection in the office of the Assistant Director Of Town Planning, Panvel Municipal Corporation.

Panvel.
Date :- 03/12/2021

**Sd/-**
**(Ganesh Deshmukh)**
Commissioner
Panvel Municipal Corporation

# टीम इंडियाचा 'विराट' विजय

## द्रविडच्या मार्गदर्शनाखाली दुसऱ्या कसोटीसह मालिकाही जिंकली




**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या वानखेडे मैदानावर रंगलेल्या कसोटी मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात भारताने न्यूझीलंडला तब्बल ३७२ धावांनी नमवले. सामन्याच्या चौथ्या दिवशी भारताने न्यूझीलंडला दुसऱ्या डावात १६७ धावांत गुंडाळले आणि कसोटीतील सर्वांत मोठा विजय नावावर केला. राहुल द्रविडच्या मार्गदर्शनाखाली विराट कोहलीचा हा पहिला विजय ठरला. यासोबतच ही मालिकाही भारताने १-० अशी जिंकली आहे.

न्यूझीलंडला पहिल्या डावात अवघ्या ६२ धावांवर गुंडाळल्यानंतर भारताने ७ बाद २७६ धावांवर आपला दुसरा डाव घोषित केला. भारताने न्यूझीलंडला ५४० धावांचे लक्ष्य दिले होते, पण पाहुण्यांना हे आव्हान पेलवले नाही. याआधी भारताने २०१५मध्ये दिल्लीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ३३७ धावांनी विजय नोंदवला होता. मयांक अग्रवालला सामनावीर, तर रविचंद्रन अश्विनला मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

भारताचा फिरकीपटू रवीचंद्रन अश्विनने कप्तान टॉम लॅथमला (६) स्वस्तात बाद करीत न्यूझीलंडला पहिला धक्का दिला. त्यानंतर अश्विनने विल यंग (२०) आणि रॉस टेलर (६) यांनाही तंबूत मार्ग दाखवत न्यूझीलंडची अवस्था खिळखिळी केली. ३ बाद ५५ अशी धावसंख्या असताना डॅरिल मिशेलने किल्ला लढवला. त्याला हेन्री निकोल्सची साथ लाभली. या दोघांनी संघाचे शतक पूर्ण केले. अक्षर पटेलने मिशेलला बाद करीत ही भागीदारी मोडली. मिशेलने सात चौकार आणि दोन षटकारांसह ६० धावा केल्या. मिशेलनंतर आलेला यष्टीरक्षक टॉम ब्लंडेल खातेही न उघडता धावबाद झाला. १२९ धावांत न्यूझीलंडने पाच फलंदाज गमावले. चौथ्या दिवशी न्यूझीलंडने आपले पाचही फलंदाज गमावले आणि त्यांचा दुसरा डाव ५६.३ षटकात १६७ धावांत संपुष्टात आला. भारताकडून फिरकीपटू जयंत यादव आणि अश्विनने प्रत्येकी चार बळी घेतले.

## 'किवीं'ना नमवून भारत बनला नं. १

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई कसोटीतील विजयासह टीम इंडिया कसोटी क्रिकेटमधील नंबर वन संघ बनला आहे. त्यांनी न्यूझीलंडकडून अव्वल स्थान हिसकावून घेतले. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून (आयसीसी) याबाबत अधिकृत घोषणा होणे बाकी आहे. आयसीसी दर बुधवारी आपली क्रमवारी अपडेट करते. त्यानंतर क्रमवारीतील बदल दिसून येतो.

किवी संघाने जून २०२१मध्ये भारताकडून हा दर्जा हिरावून घेतला होता आणि त्यानंतर जागतिक कसोटी चॅम्पियनशिप जिंकून आपले स्थान पक्के केले, पण आता टीम इंडियाने वळण घेतले आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात मालिका सुरू झाली तेव्हा न्यूझीलंड १२६ रेटिंगसह पहिल्या स्थानावर होता. त्याच वेळी भारताचे ११९ रेटिंग गुण होते. कानपूर कसोटी अनिर्णित राहिल्याने किवी संघाला या मालिकेत फायदा झाला, मात्र रेटिंगमध्ये तोटा झाला. मुंबई कसोटीतील पराभवानंतर त्याच्या नंबर वन राहण्याच्या आशा संपल्या होत्या. ऑस्ट्रेलिया सध्या १०८ रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर आहे आणि इंग्लंड १०७ रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर आहे. या दोघांपैकी जो कोणी ॲशेस मालिका जिंकेल तो क्रमवारीत वर येईल.






## हिवाळ्यात ओवा खाण्याचे आरोग्यदायी फायदे

आपल्या स्वयंपाकघरात अनेक प्रकारचे मसाले आहेत. यापैकी एक ओवादेखील आहे. हे जवळजवळ प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरात आढळते. याचे अनेक आरोग्य फायदेही आहेत. हिवाळ्यात पराठा, नमकीन, भाजी, पुरी, मथरी इत्यादी पदार्थांमध्ये याचा भरपूर वापर केला जातो. त्याचा प्रभाव खूप गरम असतो आणि शरीराला उबदार ठेवण्यास मदत करतो. त्यात प्रथिने, चरबी, फायबर आणि खनिजे यासारखे घटक मोठ्या प्रमाणात आढळतात. कॅल्शियम, फॉस्फरस, लोह आणि निकोटिनिक ॲसिडचादेखील हा एक चांगला स्त्रोत आहे. हे हिवाळ्यात सर्दी, नाक वाहणे आणि सर्दी रोखण्यास मदत करते.

हिवाळ्यात आपण पराठे, नमकीन, भाजी, पुरी, मथरी इत्यादी खाद्यपदार्थांमध्ये अजवाइन वापरू शकता. याशिवाय तुम्ही ओव्याचा चहा पिऊ शकता. तसेच ओव्याचे सेवन केल्याने वजन कमी होण्यास मदत होते. चहा बनवण्यासाठी एक ग्लास पाण्यात एक चमचा ओवा मिसळून उकळा. त्यानंतर ते गाळून मध आणि लिंबू मिसळून प्या. हिवाळ्यात शरीराला उबदार ठेवण्यास मदत होते.

ओव्याचे सेवन केल्याने शरीराला अनेक फायदे मिळतात. जर तुम्ही बद्धकोष्ठतेच्या समस्येने त्रस्त असाल तर ओवा तुमच्यासाठी खूप प्रभावी ठरू शकते. यामुळे बद्धकोष्ठता मुळापासून दूर होते.

हिवाळ्यात सर्दी-खोकला ही एक सामान्य समस्या आहे. ओवा गरम असते. याच्या सेवनाने या ऋतूत होणारा खोकला, सर्दी, कफ यासारख्या समस्या दूर होतात. चांगल्या परिणामासाठी, काळे मीठ मिसळून अजवाइन चहा प्या.

अनेक वेळा थंडीमध्ये लोकांच्या सांधेदुखीचा त्रास वाढतो. हे दूर करण्यासाठी ओवा वापरा. ओव्याच्या पावडरची पोटली बांधून गुडघे शेकावे. वेदना मुळापासून संपेल. यासोबतच ओवा पीरियड्सच्या वेदनापासून मुक्त होण्यास मदत करते. कोमट पाण्यासोबत ओवा घेतल्याने वेदना कमी होतात.

## पोयनाड येथे क्रिकेट स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

पोयनाड येथील सुप्रसिद्ध असलेल्या झुंझार युवक मंडळाच्या षष्ट्यब्दीपूर्ती वर्षाच्या निमित्ताने १४ वर्षाखालील मुलांसाठी एक दिवसीय फॉरमॅटची ४० षटकांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा १२ डिसेंबरपासून झुंझार युवक मंडळाच्या क्रीडांगणावर होणार असून रायगड जिल्ह्यातील १० संघांमध्ये खेळली जाईल.

सर्वत्र टी-२० क्रिकेटचा बोलबाला सुरू असताना झुंझार युवक मंडळाने एक दिवसीय ४० षटकांच्या स्पर्धेचे आयोजन करून युवा खेळाडूंना जास्तीत जास्त आपल्या खेळाचे कौशल्य दाखवण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या स्पर्धेत दोन गटात संघांना विभागून प्रत्येक संघाला प्रत्येकी चार साखळी सामने खेळण्यास मिळणार आहेत. सुसज्ञ क्रीडांगण, शिस्तबद्ध आयोजन, आकर्षक बक्षिसे असे या स्पर्धेचे स्वरूप असेल. रायगड प्रीमियर लीग संघटनेचे स्पर्धेला सहकार्य राहील.

झुंझार युवक मंडळाची स्थापना होऊन ६० वर्ष पूर्ण होत असल्याने यंदा षष्ट्यब्दीपूर्ती वर्ष म्हणून साजरे होणार आहे. झुंझार युवक मंडळ म्हणजे रायगड जिल्ह्यातील एक नामवंत व सुप्रसिद्ध क्रीडा संस्था असून त्यांच्याकडे स्वतःचे असे भव्य क्रीडांगण आहे. विविध वयोगटातील विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याचा मंडळाचा संकल्प या वर्षी आहे. क्रिकेट लेदरसह टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा, कबड्डी, कॅरम, बुद्धिबळ स्पर्धांचेदेखील आयोजन केले जाणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष अन्वर बुराण व सचिव किशोर तावडे यांनी दिली.

## खेलो इंडिया अंतर्गत खोपोलीत कुस्ती केंद्र

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय संचलित खेलो इंडिया या केंद्र सरकारच्या योजनेंतर्गत जिल्हा कुस्ती केंद्राची सुरुवात खोपोलीतील स्व. भाऊ कुंभार कुस्ती संकुल येथे करण्यात आली.

महाराष्ट्र राज्यात मंजूर झालेल्या अवघ्या तीन कुस्ती केंद्रांमध्ये खोपोलीच्या स्व. भाऊ कुंभार कुस्ती संकुलात कुस्ती केंद्र मंजूर करून कुस्तीगिरांचे भवितव्य घडविण्याचा संकल्प या निमित्ताने केला गेला आहे. स्व. कुंभार यांचे स्मरण करून त्यांच्याच नावे निर्माण झालेल्या संकुलात कुस्ती केंद्र सुरू करण्याचा अपूर्व योग आल्याबद्दल आपण भाग्यवान असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी सांगून या योजनेंतर्गत जास्तीत जास्त निधी या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न असणार असल्याचे सांगितले.

राज्य क्रीडा प्रशिक्षक संदीप वांजळे यांनी आपल्या सांगितले की, खोपोली शहरातील कुस्तीगीरांची संख्या पाहता याच ठिकाणी कुस्ती केंद्र असावे असा आग्रह होता. त्यानुसार प्रशासकीय पूर्तता करून हे केंद्र मंजूर झाल्याने येथून देशपातळीवर चांगले कुस्तीपटू निर्माण करण्याचा प्रयत्न होईल.

खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष सुनील पाटील यांनी या कुस्ती केंद्राच्या माध्यमातून खोपोली शहराचे नाव या क्षेत्रात अधोरेखित होईल असा विश्वास व्यक्त केला. खोपोलीच्या उपनगराध्यक्ष विनिता कांबळे यांनी या कुस्ती केंद्रासाठी नगरपालिकेकडून शक्य तितकी मदत करण्याचा मनोदय व्यक्त केला. नगराध्यक्ष सुमन औसरमल यांनी खेलो इंडिया योजनेंतर्गत मंजूर झालेले कुस्ती केंद्र म्हणजे खोपोलीचा सन्मान असल्याचे सांगत या केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या अधिकाधिक खेळाडूंना प्राधान्य मिळेल याकडे आपलाही कटाक्ष असेल, असे सांगत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खालापूर तालुका कुस्तीगीर संघाचे सचिव जगदिश महाराजचे यांनी केले, तर आभार कुस्ती प्रशिक्षक राजू कुंभार यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त कुस्तीपटू मारुती आडकर, खोपोलीचे माजी उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विजय पाटील, सुभाष घासे, क्रीडा प्रशिक्षक डॉ जयवंत माने, राजाबापू सगळगीळे, पद्माकर गायकवाड, हेमंत खाडे आदी व्यासपीठावर होते. या वेळी बाल आणि युवा कुस्तीगीरांसह त्यांच्या पालकांची उपस्थिती होती.

### अभिवादन!



पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिवादन केले. सोबत उपाध्यक्ष संजय पाटील, प्रवीण खंडागळे, जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील आदी.

### अभिनंदन अन् शुभेच्छा!



पनवेल : शहर पोलीस ठाण्याचे नवनियुक्त वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांचे भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, अजय तेजे उपस्थित होते.






## ओ शेठ, तुम्ही नादच केलाय थेट!

### 'अतरंगी' अंपायरवर इंग्लंडचा वॉनही फिदा



**लंडन : वृत्तसंस्था**

क्रिकेटमध्ये पंचगिरी करणे हे खरोखरच एक कठीण काम असते, परंतु बिली बाऊडेन त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीत अनेकदा वेगळ्या हावभावाद्वारे पंचगिरी करीत असत. अशाच एका पंचाचा व्हिडीओ सध्या भलताच व्हायरल झाला आहे.

व्हायरल क्लिप पुरंदर प्रीमियर लीग या महाराष्ट्रातील स्थानिक क्रिकेट स्पर्धेची आहे, जिथे अंपायरिंगची एक अनोखी शैली पाहायला मिळाली. सामान्यतः पंच वाइड सिग्नल देण्यासाठी आपले हात बाजूला पसरवतात, पण पुरंदर प्रीमियर लीगमध्ये या अंपायरने हा सिग्नल देण्यासाठी त्याच्या पायांचा वापर केला.

इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉनही महाराष्ट्राच्या या अंपायरवर आश्चर्यचकित झाला आहे. त्याने हा व्हायरल व्हिडीओ शेअर केला. नक्कीच आम्हाला या माणसाला आससीसीच्या एलिट पॅनेलमध्ये सहभागी होताना पाहायचे आहे, असे कॅप्शन वॉनने या व्हिडीओला दिले आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com